## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मानखुर्द पोलिस स्टेशन, मुंबई यांचा दि.१७/०३/२०११ रोजीचा अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२०/२०११/जा.२३२, दि.२३/०३/२०११, २३/०४/२०११.

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मानखुर्द पोलिस स्टेशन यांचे दि.०१/०४/२०११ व २९/०४/२०११ रोजीचे अभिवेदन.

४) शकील अहमद अब्दुल मुनाफ खान, इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी व दिदार हुसेन महम्मद उमर यांचे दिनांक १९/०४/२०११ रोजीचे टपालामार्फत सादर केलेले स्वतंत्र लेखी निवेदने.

५) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मानखुर्द पोलिस स्टेशन यांचे दि.२१/०७/२०११ रोजीचे पत्र.

६) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२०/२०११/जा.६२८, दि.०४/०८/२०११.

७) शकील अहमद अब्दुल मुनाफ खान, इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद. सिध्दीकी, दिदार हुसेन महम्मद उमर व शकील धारावीवाला यांचे दिनांक १६/०८/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

८) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलिस स्टेशन यांचे दिनांक १६/०८/२०११ रोजीचे टपालामार्फत सादर केलेले अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२०/२०११/जा. ७22
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक : ०८ /०८/२०११.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

कुर्ला स्क्रॅप, मंडाळा, मानखूर्द येथे इसम नामे इम्रान, फैजल, शकील, दिदार, शकील धारावीवाला यांनी त्याचे गोडावूनमध्ये पेट्रोलियम पदार्थांचा बेकायदेशिर साठा करुन ठेवला आहे, अशी खात्रीलायक खबर दिनांक २९/०१/२०११ रोजी रात्री २३:३० वाजता मानखूर्द पोलिस स्टेशनला मिळाल्यावरुन तेथील अधिकाऱ्यांनी कुर्ला स्क्रॅप मंडाळा येथे मस्जीद रोडने पुढे जावून नाल्याच्या बाजूचे गोडावून जवळ जावून वरील नमूद इसमांची पत्र्याच्या गोडावूनचा शोध घेतला असता, सदर ठिकाणी पत्राचे ५ गोडावून मिळून आली. सदरची गोडावून कुलूप बंद

असल्याचे दिसून आले. सदर ५ गोडावूनच्या पत्र्याचे फटीतून विजेरीच्या प्रकाशात आत डोकावून पाहणी केली असता, गोडावूनमध्ये लोखंडी ड्रम व प्लॅस्टिक ड्रमचे तेलकटलेल्या स्थितीत साठा असल्याचे दिसून आले.

यातील गोंडावूनचे मालक इम्रान याचे ठावठिकाणा बाबतची माहिती घेण्याचा प्रयत्न केला. परंतू उपयुक्त माहिती मिळून आली नाही. सदर गोडावूनमध्ये संशयास्पद पेट्रोलियम पदार्थाचा साठा असल्याचे दिसून येत असल्याने लागलीच दोन पंचाना बोलावून पंचनाम्याचा उद्देश समजावून सांगून पंचासमक्ष गोडावूनचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन गोडावूनची पाहणी केली असता गोडावूनमध्ये काळसर, तांबूस तेलाने भरलेले प्लॅस्टिक व लोखंडी ड्रम दिसून आले. तसेच प्लॅस्टिकचे व लोखंडी रिकामे ड्रम दिसून आले. गोडावूनचे दक्षिण बाजूस पत्र्याचे भिंतीलगत तीन लोखंडी टाक्या तेलाने भरलेल्या दिसून आल्या. तसेच झाकण उघडून पाहता ड्रममध्ये काळसर तांबूस तेल असल्याचे दिसून आले. सदरचे ड्रम पंचासमक्ष पंचनामा करुन ताब्यात घेतले. त्याचे वर्णन खालील प्रमाणे,

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ५० लोखंडी ड्रम त्यात काळसर तांबूस रंगाचे तेलाने भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | १०००० लि. | २,००,०००/- |
| २ | ९० लोखंडी ड्रम त्यात काळसर तांबूस रंगाचे तेलाने भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | १८००० लि. | ३,६०,०००/- |
| ३ | ३ लोखंडी टाक्या त्यात काळसर तांबूस रंगाचे तेलाने भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | ७००० लि. | १,४०,०००/- |
| ४ | ५० लोखंडी रिकामे ड्रम | ५० नग | १०,०००/- |
| ५ | १५ प्लॅस्टिकचे रिकामे ड्रम | १५ नग | ३,०००/- |
| | | एकूण | ७,१३,०००/- |

त्यानंतर त्या गोडावूनचे बाजूचे फैजल नावाचे इसमाचे पत्र्याचे गोडावूनचे कुलूप तोडून गोडावूनमध्ये जाऊन पाहणी केली असता, गोडावूनमध्ये खालील वर्णनाचे लालसर तांबूस तेलाने भरलेले ड्रम दिसून आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २८० लोखंडी ड्रम त्यात काळसर तांबूस रंगाचे तेलाने भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | ५६००० लि. | ११,२०,०००/- |
| २ | ९१ लोखंडी ड्रम त्यात काळसर तांबूस रंगाचे तेलाने भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | १८२०० लि. | ३,६४,०००/- |
| ३ | ८९ लोखंडी रिकामी ड्रम | ८९ नग | १७,८००/- |
| | | एकूण | १५,०१,८००/- |

त्यानंतर बाजूचे शकील नावाचे इसमाचे गोडावूनच्या प्रवेशद्वाराचे कुलूप तोडून गोडावूनमध्ये पंचासमक्ष प्रवेश करुन पाहणी केली असता, गोडावूनमध्ये खालील वर्णनाचा साठा आढळून आला.

0003

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २२ प्लॅस्टिकचे ड्रम त्यात काळसर तांबूस रंगाचे तेलाने भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | ४४०० लि. | ८८,०००/- |
| २ | ४१ लोखंडी ड्रम त्यात काळसर तांबूस रंगाचे तेलाने भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | ८२०० लि. | १,६४,०००/- |
| ३ | ३१ प्लॅस्टिकचे रिकामे ड्रम | ३१ नग | ६,२००/- |
| ४ | २३ लोखंडी रिकामी ड्रम | २३ नग | ८,६००/- |
| | | एकूण | २,६६,८००/- |

त्यानंतर समोरील फैजल यांचे दुसरे पत्र्याचे गोडावूनच्या प्रवेशद्वाराचे कुलूप तोडून गोडावूनमध्ये पंचासमक्ष प्रवेश करुन गोडावूनची पाहणी केली असता, गोडावूनमध्ये खालील वर्णनाचे काळसर व तांबूस तेलाने भरलेले ड्रम व रिकामे लोखंडी व प्लॅस्टिक ड्रम तसेच तेलानी भरलेली लोखंडी टाकी मिळून आली.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ५७ प्लॅस्टिकचे ड्रम त्यात काळसर तांबूस रंगाचे तेलाने भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | ११४०० लि. | २,२८,०००/- |
| २ | १५ लोखंडी ड्रम त्यात काळसर तांबूस रंगाचे तेलाने भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | ३००० लि. | ६०,०००/- |
| ३ | ८ प्लॅस्टिकचे रिकामे ड्रम | ८ नग | १,६००/- |
| ४ | ९८ लोखंडी रिकामी ड्रम | ९८ नग | १९,६००/- |
| ५ | एक लोखंडी टाकी त्यात काळसर तांबूस रंगाचे तेल | ३००० लि. | ६०,०००/- |
| | | एकूण | ३,६९,२००/- |

त्यानंतर लगतचे शकील धारावीवाला याच्या पत्र्याचे गोडावूनच्या प्रवेशद्वाराचे कुलूप तोडून गोडावूनमध्ये पंचासमक्ष प्रवेश करुन गोडावून मधील लाईट चालू करुन पाहणी केली असता, गोडावूनमध्ये खालील वर्णनाचे ग्रीस सारख्या काळसर तेलकट पदार्थाने भरलेले ड्रम मिळून आले. त्याचे वर्णन खालील प्रमाणे,

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ९७ लोखंडी ड्रम त्यात ग्रीस सारखे तेलकट पदार्थाने भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | १९४०० लि. | २,४२,५००/- |
| | | एकूण | २,४२,५००/- |

तसेच सदर गोडावूनच्या बाहेरील बाजूस रस्त्याच्या बाजूला उघडया जागेत ग्रीस सारखा तेलकट काळसर पदार्थ मिळून आला. त्याचे वर्णन खालील प्रमाणे,

0004

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १३ लोखंडी ड्रम त्यात ग्रीस सारखे तेलकट पदार्थाने भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | २६०० लि. | ३२,५००/- |
| २ | ९ प्लॅस्टिकचे ड्रम, त्यात काळसर तांबूस रंगाचे ग्रीस सारखा पदार्थाचे भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | १८०० लि. | १७,५००/- |
| ३ | ८ प्लॅस्टिकचे रिकामी ड्रम | ८ नग | १,६००/- |
| ४ | ५ लोखंडी रिकामी ड्रम | ५ नग | १,०००/- |
| | | एकूण | ५२,६००/- |

तसेच सदर गोडावूनच्या मागील बाजूस दिदार नावाच्या इसमाचे एका बाजूने उघडे असलेले पत्र्याचे गोडावून नाल्याच्या बाजूला दिसून आले. त्यात प्रवेश केला असता खालील वर्णनाचा माल मिळून आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ७० लोखंडी ड्रम त्यात ग्रीस सारखे तेलकट पदार्थाने भरलेले ड्रम प्रत्येकी २०० लिटर पदार्थ | १४००० लि. | १,७५,०००/- |
| | | एकूण | १,७५,०००/- |

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी मानवी जिवीतास धोक्यात येणारा वरील नमूद द्रवपदार्थ त्यांचे कब्जात बाळगून, विनापरवाना हलक्या प्रतीचे ज्वलनशिल पेट्रोलियम पदार्थ वापरुन त्यामध्ये कोणतेतरी रासायनीक द्रव व पावडर भेसळ करुन सदरचे जप्त ऑईल व ग्रीस सारखा पदार्थ उच्च प्रतीचा आहे असे भासवून ग्राहकांना विक्रीसाठी विनापरवाना साठा करुन ठेवल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) भा. दं. वि. चे कलम २८४, २८५, ४२०, ३४ (२) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, १० (३) दि महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट व स्लोप (ॲक्विझीशन, सेल, स्टोरेज ॲन्ड प्रिव्हेन्शन ऑफ युज इन ऑटोमोबाईल) (अनुज्ञापन) ऑर्डर २००७ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द मानखुर्द पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३५/२०११, दि.३०/०१/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन उपरोक्त मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच उपरोक्त सर्व जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मानखुर्द पोलिस स्टेशन, मुंबई यांनी वाचावे क्र.१ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का

CONTROLLER OF RATIONING HEAD ... MUMBAI

करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. ०१/०४/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली. 0005

दिनांक ०१/०४/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री वाय. डब्ल्यू. शिंदे हे उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र.३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस शकील अहमद अब्दुल मुनाफ खान, इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी व दिदार हुसेन महम्मद उमर हे उपस्थित राहीले व त्यांनी सुनावणीची पुढील तारीख मिळावी म्हणून लेखी विनंती केली. तथापी, सदर सुनावणीस शकील धारावीवाला हे उपस्थित राहीले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दिनांक १९/०४/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १९/०४/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. त्यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक २९/०४/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २९/०४/२०११ रोजीच्या सुनावणीस शकील अहमद अब्दुल मुनाफ खान, इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी व दिदार हुसेन महम्मद उमर हे उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे निवेदन वाचावे क्र. ४ अन्वये टपालामार्फत या कार्यालयात सादर केले. तसेच सदर सुनावणीस शकील धारावीवाला हे उपस्थित राहीले. तथापी, त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे सुनावणीचेवेळी सादर केले नाही.

प्रस्तुत प्रकरणी जप्त केलेला द्रव पदार्थ कोणत्या प्रकारचा आहे ? तसेच त्यात भेसळ होती किंवा कसे ? याकरीता रासायनिक पृथःकरण अहवालाची अत्यंत आवश्यकता असल्याने सदरचा पृथःकरण अहवाल प्राप्त होईपर्यंत प्रकरण अंतिम निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

तदनंतर, जप्त केलेल्या द्रवपदार्थाच्या नमुन्यांचा रासायनिक पृथःकरण अहवाल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस स्टेशन यांनी त्यांचे वाचावे क्र.५ अन्वये या कार्यालयास सादर केला. सदर रासायनिक पृथःकरण अहवालाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी म्हणून वाचावे क्र. ६ अन्वये नोटीस बजावून पुढील सुनावणी दिनांक १६/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस शकील अहमद अब्दुल मुनाफ खान, इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी, दिदार हुसेन महम्मद उमर व शकील धारावीवाला हे उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे निवेदन वाचावे क्र. ७ अन्वये टपालामार्फत या कार्यालयात सादर केले.

सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. तथापी, दरम्यान त्यांनी त्यांचे अभिवेदन वाचावे क्र. ८ अन्वये टपालामार्फत सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात येत आहे.

युक्तिवाद :-

सुनावणीचे वेळी तपासी पोलीस अधिकारी तथा पोलीस उपनिरीक्षक यांनी सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील आरोपी शकील धारावीवाला उर्फ शकील नझीमउद्दीन खान याने मा.न्यायालयात अटक पुर्व जामीन मिळणेसाठी अर्ज केला असून, सदर आरोपीस अंतरीम जामीन मिळाला आहे. मा.न्यायालयाने अंतरीम जामीन दिल्यानंतर पोलीस ठाणेस हजर होणे आवश्यक असतांनाही तो अद्यापपर्यंत पोलीस ठाणेस हजर झालेला नाही. नोटीस बजावण्याकरीता त्याचे गोडावूनवर शोध घेतला असता, तो मिळून आलेला नाही. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल मोठ्या प्रमाणावर असल्याने व तो मुद्देमाल जागेवरुन हलविणे कठीण असल्याने जप्त मुद्देमालाच्या संरक्षणाकरीता यातील गोडावून सिल करण्यात आले होते. गोडावून सिलबंद असल्याने आरोपींचे दैनंदिन व्यवहार बंद झाले आहे. तरी त्यांचे सिलबंद गोडावून योग्य त्या अटी व शर्तीवर देवून त्यांना दैनंदिन कायदेशीर व्यवहार करण्यास हरकत नसल्याचे नमुद केले आहे.

शकील अहमद अब्दुल मुनाफ खान यांचे वतीने ॲड एच. एस. आनंद यांनी सादर केलेल्या खुलाशात, गाळा नं.३३ मध्ये त्यांचे अशील बेस ऑईलचा ट्रेडर्सचा व्यवसाय करीत असून, बेस ऑईलची प्रक्रीया करीत नसल्याने त्याला जीवनावश्यक वस्तु कायदा लागू होत नाही. तसेच दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय,ॲण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ चे कलम २ लागू होत नाही. त्याबाबत मा.उच्च न्यायालय येथील केस क्र.२००२ बॉम्बे सीआर (क्री.) १७० मध्ये झालेल्या निर्णयाचा संदर्भ दिला आहे. त्यांचे अशीलाच्या व्यवसायाकरीता आवश्यक असणाऱ्या कोणत्याही कागदपत्राची व परवान्याची पडताळणी न करता पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. परतु त्यांचे अशीलाकडे ऑईल साठवणूक करीता आवश्यक तो परवाना तसेच उद्योग संचालक यांचा परवाना आहे. जप्त केलेल्या मुद्देमालात कोणतीही मिक्सींग केलेली नाही किंवा त्यांचे अशीलाने परवान्याशिवाय ऑईलची विक्री केलेली नाही. जीवनावश्यक वस्तु कायद्याचे कलम ३ नुसार जीवनावश्यक वस्तुच जप्त केल्यास सदर कायद्याचे कलम ६-अ नुसार हे कार्यालय आदेश देवू शकतात. परंतु सदर गुन्ह्यात जप्त केलेले बेस ऑईल हा पदार्थ लुब्रीकेटींग ऑईल ऑर्डर १९८७ नुसार जीवनावश्यक वस्तुत मोडत नाही. त्यांचे अशील विनापरवाना व्यवसाय करीत नसून, अधिकृतपणे व्यवसाय करीत आहे. भेसळ केल्याचा कोणताही पुरावा त्यांचे अशीलाविरुध्द नाही. त्यामुळे या कार्यालयाने दिलेली नोटीस लागू होत नसल्याचे नमूद केले आहे.

इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी व दिदार हुसेन महम्मद उमर यांचे वतीने ॲड एच. एस. आनंद यांनी वरील प्रमाणेच खुलासा केला आहे. तसेच दिदार हुसेन महम्मद उमर यांचे वतीने सादर केलेल्या सदरच्या खुलाशात, त्यांचे अशील यांनी नमुद माल व परवाना मोहम्मद शकील निजामुद्दीन खॉन यांना

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD OF ... MUMBAI

विकला असल्याचे नमुद करुन शकील अहमद निजामुद्दीन खॉन यांचे नावे असलेला बृहन्मुंबई महानगर पालीकेचा परवाना सादर केला आहे.

तद्नंतर रासायनिक पृथ:करण अहवालाच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस स्टेशन यांनी दिनांक १६/०८/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या अभिवेदनात, प्रस्तुत प्रकरणी प्राप्त झालेल्या १४ नमुन्यांचा रासायनिक पृथ:करण अहवालापैकी शकील अहमद अब्दुल मुनाफ खान, इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी व शकील निजामुद्दीन खान उर्फ शकील धारावीवाला या आरोपीच्या जप्त मुद्देमालाबाबत लुब्रीकेटिंग ऑईल तसेच दिदार हुसेन महम्मद उमर या आरोपीच्या जप्त मुद्देमालाबाबत तार हा पदार्थ असल्याचे पृथ:करण अहवालात उल्लेख केला आहे. तरी जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीबाबत योग्य ते आदेश व्हावेत, असे नमुद केले आहे.

दिनांक १६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित शकील अहमद अब्दुल मुनाफ खान, इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी व शकील धारावीवाला यांनी युक्तीवाद केला की, त्यांचे निवेदन वकीलामार्फत यापूर्वी सादर केले आहे. जप्त केलेल्या द्रवपदार्थाचा पृथ:करण अहवाल ल्युब्रिकेटिंग ऑईल असा आला असल्याने जप्त केलेला मुद्देमाल त्यांना परत मिळावा, असे नमूद करुन तसे स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले.

तसेच दिनांक १६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित दिदार हुसेन महम्मद उमर यांनी युक्तीवाद केला की, सदर प्रकरणी त्यांचे निवेदन वकीलामार्फत यापूर्वी सादर केले आहे. जप्त केलेल्या द्रवपदार्थाचा पृथ:करण अहवाल तार असा आला असल्याने जप्त केलेला मुद्देमाल त्याला परत मिळावा, असे नमूद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

<u>निष्कर्ष :-</u>

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनाक २९/०१/२०११ रोजी मानखूर्द पोलीस स्टेशन यांना मिळालेल्या बातमीनुसार तेथील अधिकाऱ्यांनी कुर्ला स्क्रॅप, मंडाळा, मानखूर्द येथे मस्जीद रोडने पुढे जावून नाल्याच्या बाजूचे गोडावून जवळ पत्र्याच्या गोडावूनचा शोध घेतला असता, सदर ठिकाणी पत्राचे ५ गोडावून मिळून आली. सदरची गोडावून कुलूप बंद असल्याचे दिसून आले. सदर ५ गोडावूनच्या पत्र्याचे फटीतून विजेरीच्या प्रकांशात आत डोकावून पाहणी केली असता, सदर गोडावूनमध्ये संशयास्पद पेट्रोलियम पदार्थाचा साठा असल्याचे दिसून येत असल्याने दोन पंचाना बोलावून पंचासमक्ष गोडावूनचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन गोडावूनची पाहणी केली असता. गोडावूनमध्ये

काळसर, तांबूस तेलाने भरलेले व रिकामे प्लॅस्टिक तसेच लोखंडी ड्रम त्याचप्रमाणे तीन लोखंडी टाक्या तेलाने भरलेल्या दिसून आल्या. अशाप्रकारे शकील अहमद अब्दुल मुनाफ खान, इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी शकील निजामुद्दीन खान उर्फ शकील धारावीवाला व दिदार हुसेन मोहम्मद उमर यांच्या पाचही गोडावूनची पाहणी केली असता, त्यामध्ये काळसर व तांबूस तेलाने भरलेले ड्रम तसेच ग्रीस सारखे तेलकट पदार्थाने भरलेले ड्रम आढळून आले. सदरचा द्रवपदार्थ त्यांचे कब्जात बाळगून, विनापरवाना हलक्या प्रतीचे ज्वलनशिल पेट्रोलियम पदार्थ वापरुन त्यामध्ये कोणतेतरी रासायनीक द्रव व पावडर भेसळ करुन सदरचे जप्त ऑईल व ग्रीस सारखा पदार्थ उच्च प्रतीचा आहे असे भासवून ग्राहकांना विक्रीसाठी विनापरवाना साठा करुन ठेवल्याने पाचही गोडावून मधील द्रवपदार्थाचा साठा पोलीसांनी जप्त केला.

प्रस्तुत गुन्ह्यात जप्त केलेल्या द्रवपदार्थाचे नमुने पोलीसांनी रासायनिक पृथःकरणासाठी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पाठविले असता, सदर नमुन्यांचा पृथःकरण अहवाल Exhibit Nos. 1 to 13 contain lubricating oil तसेच Exhibit Nos. 14 appears to be tar असा प्राप्त झालेला आहे. पृथःकरण अहवालाच्या अनुषंगाने नमुद गाळ्यातील जप्त साठ्याचे मालक यांनी सुनावणीचे वेळी सादर केलेल्या खुलाशात, सदर गुन्ह्यात त्यांचे निवेदन वकीलामार्फत यापूर्वी सादर केले असून, जप्त केलेल्या द्रवपदार्थाचा पृथःकरण अहवाल ल्युब्रिकेटिंग ऑईल त्याचप्रमाणे तार असा आला असल्याने जप्त केलेला मुद्देमाल त्यांना परत मिळावा, असे नमूद केले आहे. तसेच सदर गुन्ह्यात प्राप्त झालेल्या १४ नमुन्यांचा रासायनिक पृथःकरण अहवालापैकी शकील अहमद अब्दुल मुनाफ खान, इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी व शकील निजामुद्दीन खान उर्फ शकील धारावीवाला या आरोपीच्या जप्त मुद्देमालाबाबत लुब्रीकेटिंग ऑईल तसेच दिदार हुसेन महम्मद उमर या आरोपीच्या जप्त मुद्देमालाबाबत तार हा पदार्थ असल्याचे पृथःकरण अहवालात उल्लेख केला असल्याने जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीबाबत योग्य ते आदेश व्हावेत, असा अहवाल पोलीसांनी दिला आहे.

प्रस्तुत प्रकरणी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांनी दिलेला रासायनिक पृथःकरण अहवाल तसेच पोलीसांचे अभिवेदन पहाता, शकील अहमद अब्दुल मुनाफ खान, इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी व शकील निजामुद्दीन खान उर्फ शकील धारावीवाला यांचे गाळ्यातील जप्त केलेला द्रवपदार्थ ल्युब्रीकेटिंग ऑईल असल्याचे तसेच दिदार हुसेन महम्मद उमर याच्या गाळ्यातील जप्त केलेला द्रवपदार्थ तार म्हणजेच डांबर हा पदार्थ असल्याचे दिसून येत असून, त्या द्रवपदार्थात कोणतीही भेसळ नसल्याचे स्पष्ट होत आहे.

सदर गुन्ह्यातील जप्त साठ्याचे मालक शकील अहमद अब्दुल मुनाफ खान, इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी यांनी दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय,ॲण्ड डिस्ट्रीब्युशन

रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ मधील तरतुदीनुसार ल्युब्रीकेटींग ऑईलचा व्यवसायाकरीता आवश्यक असलेला परवाना संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त केले असल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. 009

तथापी, शकील अहमद अब्दुल मुनाफ खान यांनी लुब्रीकेटिंग ऑईलच्या साठवणुकीकरीता आवश्यक असलेला बृहन्मुंबई महानगर पालीका यांचेकडील अथवा विस्फोटक विभागाकडील परवाना सुनावणीचेवेळी सादर केलेला नाही. तसेच इम्रान अहमद सिध्दीकी, शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी यांनी साठवणुकीकरीता सादर केलेला विस्फोटक विभागाच्या परवान्यावर नमुद साठवणुकीची मर्यादा पहाता, सदर परवान्यावर नमुद मर्यादेपेक्षा जास्त लुब्रीकेटींग ऑईलची साठवणूक केली असल्याचे दिसून येत असल्याने सबंधित तीनही परवानाधारकावर नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याकरीता उद्योग सह संचालक (एमएमआर) तसेच विस्फोटक विभाग या परवाना प्राधिकरणास स्वतंत्र कळविण्यात येत आहे.

सबब, सद्य:परिस्थितीत माझे समोर असलेली उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, शकील अहमद अब्दुल मुनाफ खान यांचे गाळ्यातील एकूण १२६०० लिटर लूब्रीकेटींग ऑईलचा साठा, इम्रान अहमद सिध्दीकी यांचे गाळ्यातील एकूण ३५००० लिटर लूब्रीकेटींग ऑईलचा साठा तसेच शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी यांचे दोन्ही गाळ्यातील एकूण ९१६०० लिटर लूब्रीकेटींग ऑईलचा साठा हा त्यांच्या मुल्याएवढया किंमतीच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर त्यांच्या मालकांस परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तसेच दिदार हुसेन महम्मद उमर यांनी सुनावणीचेवेळी, दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय, ॲण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ मधील तरतुदीनुसार व्यवसायाकरीता आवश्यक असलेला उद्योग सह संचालक यांचेकडील मे.रोझ ट्रेडिंग कंपनीचे नावे असलेला परवाना क्र.एमएमआर/ ल्यूब ऑईल ॲण्ड ग्रिसेस आदेश/०००७/२००४/२३४७ सादर केला आहे. सदर परवान्यावर नमुद व्यवसायाचा पत्ता पहाता, तो जी.एन./एमसी/१५० १/३, सनाऊल्ला कंपाऊंड, धारावी, मुंबई १७ असा असून, पोलीसांनी कुर्ला स्क्रॅप, मंडाळा, मानखूर्द या ठिकाणी धाड टाकून साठा जप्त केला आहे. त्याचप्रमाणे सदरचा परवाना मोहम्मद शकील निजामुद्दीन खॉन यांना विकला असल्याचे सुनावणीचेवेळी सादर केलेल्या खुलाशात नमुद केले आहे. दिदार हुसेन महम्मद उमर यांनी सादर केलेला बृहन्मुंबई महानगर पालीका यांचेकडील परवाना क्र. ७६१०१९७६७ पहाता, तो शकील अहमद निजामुद्दीन खॉन यांचे नावे असून, त्यावरील पत्ता जी.एन./एमसी/१५० १/३, सनाऊल्ला कंपाऊंड, धारावी, मुंबई १७ असा असल्याचे दिसून येते. यावरुन आरोपी दिदार हुसेन यांनी सुनावणीचेवेळी, त्यांना व्यवसायाकरीता आवश्यक असलेला परवाना सादर केला असला तरी, परवान्यावरील नमुद पत्त्यावर जप्त द्रव पदार्थाची साठवणूक न करता, घटनेच्या ठिकाणी बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे साठवणूक केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असून,

दिदार हुसेन मोहम्मद उमर यांचे गाळ्यातील जप्त केलेला डांबराचा साठा अवैध ठरतो. सबब; सदरचा संपुर्ण एकूण १४००० लिटर डांबराचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक १६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीचे वेळी शकील धारावीवाला यांनी केलेल्या खुलाशात, त्यांनी त्यांचे निवेदन वकीलामार्फत यापूर्वी सादर केले असल्याचे नमूद करुन जप्त केलेल्या द्रवपदार्थाचा पृथ:करण अहवाल ल्युब्रिकेटिंग ऑईल असा आला असल्याने जप्त केलेला मुद्देमाल त्यांना परत मिळावा, अशी विनंती केली. तथापी, जप्त केलेल्या द्रवपदार्थाबाबत शकील धारावीवाला यांनी त्यांचे म्हणणे सुनावणीचेवेळी सादर केले नाही. तसेच दि ल्युब्रीकेटींग ऑईल्स ॲण्ड ग्रीसेस (प्रोसेसिंग, सप्लाय,ॲण्ड डिस्ट्रीब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ मधील तरतुदीनुसार व्यवसायाकरीता आवश्यक असलेला परवानाही सादर केलेला नाही. यावरुन आरोपी शकील धारावीवाला यांनी घटनेच्या ठिकाणी असलेल्या गाळ्यात विनापरवाना व बेकायदेशीररित्या लुब्रीकेटिंग ऑईलची खरेदी, विक्री व साठवणूक केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असून, सदरचा संपुर्ण साठा अवैध ठरतो.. सदर आदेशातील तरतदुीनुसार लुब्रीकेटींग ऑईलच्या व्यवसायाकरीता संबंधीत प्राधिकरणाचा परवाना घेणे आवश्यक असतांनासुध्दा शकील धारावीवाला यांनी तसा परवाना प्राप्त करुन घेतलेला नाही.. सबब, शकील धारावीवाला यांचे गाळ्यातील एकूण २३८०० लिटर लूब्रीकेटींग ऑईलचा साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मानखूर्द पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३५/२०११, दि.३०/०१/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

<u>आदेश :</u>

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेले शकील अहमद अब्दुल मुनाफ खान यांचे गाळ्यातील एकूण १२६०० लिटर लूब्रीकेटींग ऑईलचा साठा, इम्रान अहमद सिध्दीकी यांचे गाळ्यातील एकूण ३५००० लिटर लूब्रीकेटींग ऑईलचा साठा तसेच शाह फैजल नबी मोहम्मद सिध्दीकी यांचे दोन्ही गाळ्यातील एकूण ९१६०० लिटर लूब्रीकेटींग ऑईलचा साठा हा त्यांच्या मुल्याएवढया किंमतीचे क्षतीपुर्ती बंधपत्र पोलिसांनी घेऊन त्यांच्या मालकांस परत करण्यात यावा.

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD OFF... MUMBAI

२) दिदार हुसेन मोहम्मद उमर यांचे गाळ्यातील एकूण १४००० लिटर डांबराचा साठा तसेच शकील धारावीवाला यांचे गाळ्यातील एकूण २३८०० लिटर लूब्रीकेटींग ऑईलचा साठा हा शासनजमा करण्यात यावा.

३) सदरचा साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) दिदार हुसेन मोहम्मद उमर तसेच शकील धारावीवाला यांचे गाळ्यातील जप्त करण्यात आलेले एकूण १८५ लोखंडी रिकामे ड्रम, १७ प्लॅस्टिकचे रिकामे ड्रम इ. वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी

सही/
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) दिदार मोहमद उमर चौधरी
२) इम्रान अहमद सिध्दीकी
३) शाह फैजल नबिमोहमद सिध्दीकी
४) शकील अहमद अब्दुल मुनाफ खान
५) शकील धारावीवाला
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मानखूर्द पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानखुर्द पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतावर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.